**PRESS RELEASE**

**SWaCH launches labels for appropriate disposal of diapers!!**

Each day waste pickers have to directly handle hundreds of soiled sanitary pads and diapers ( baby and adult). This is not only degrading, but is also a threat to their health. SWaCH has designed a S.T Dispo bag which is an identifiable newspaper bag for the appropriate disposal of soiled sanitary pads. However, there has been an urgent need to look into the appropriate disposal of soiled diapers as well.




Responding to this need SWaCH has designed an identifiable label for the disposal of soiled diapers. Bright yellow in color, the label ( which is in sticker form) should be stuck around a bag containing soiled diapers.

The labels are priced at Rs. 2 per label and come in sheets of 10.

" This is a most welcome innovation. Once we see this label, we won't have to open the bag to see if it contains any recyclables" says Shobha Kamble a SWaCH member working in Kasba peth.

Over the past two years SWaCH has been repeatedly trying to contact sanitary towels (S.Ts) and diaper manufacturing companies to discuss sustainable methods of disposal of their products. According to the provisions of Extended Producer's Responsibility (EPR) included in the Plastic Waste (Management and Handling) Rules 2011, notified by the Ministry of Environment and Forests on 4th February, 2011, the producers are required to finance, and organize a system for environmentally sound management of waste (especially non-biodegradable waste) generated from their products and to take responsibility for the end of life of their products Sanitary pads and diapers cannot be recycled and are not biodegradable either. Companies need to look into the entire life cycle of their products – this includes issues related to direct handling as well as sustainable disposal.

Wastepickers are suffering due to the complete inaction of these manufacturing companies. SWaCH therefore has time and again had to develop strategies and products to ensure that the health and dignity of wastepickers is preserved. This diaper disposal label is another step in this direction.

To place an order, citizens can either call the SWaCH helpline 9765999500 or email swachcoop@gmail.com.

Wastepickers truly hope that people understand the importance of using these identifiable labels. Why should they have to directly handle someone else's bodily waste??

*For further information please call Manisha Desai on 9765405455*

**प्रसिद्धीपत्रक**

**डायपर्सची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी 'स्वच्छ'ने तयार केली नवी लेबल्स**

वापरलेले व घाणीने भरलेले लहान –मोठ्यांचे डायपर्स आणि सॅनिटरी नॅपकिन्स कचरावेचकांना दररोज हाताळावे लागतात. हे काम केवळ अपमानकारकच नव्हे तर आरोग्याला हानीकारकदेखील आहे. सॅनिटरी नॅपकिन्स टाकण्यासाठी रद्दी कागदांपासून सहज ओळखता येतील अशा लहान पिशव्या तयार करुन त्यांची विक्री करण्यात 'स्वच्छ'ने पुढाकार घेतला आहेच. परंतु त्याच बरोबर वापरलेले डायपर्स टाकण्यासाठीदेखील असाच काही पर्याय शोधण्याची नितांत गरज होती.




ही गरज लक्षात घेऊन, वापरलेल्या डायपर्सच्या पिशव्यांवर चिकटवता येतील अशी लेबल्स 'स्वच्छ' ने तयार केली आहेत. ज्या पिशवीत वापरलेले डायपर्स घातले असतील त्याच्याभोवती ही भडक पिवळ्या रंगाची लेबल्स गुंडाळून चिकटवता येतील.

प्रत्येक लेबलची किंमत रु २ असून, १० लेबल्स असलेली एक पट्टी असेल.

कसबा पेठेत काम करणाऱ्या 'स्वच्छ'च्या सदस्या शोभा कांबळे म्हणतात, "हा एक अतिशय स्तुत्य शोध आहे. यामुळे ही लेबल्स असलेल्या पिशव्या आम्हांला उघडाव्याच लागणार नाही. त्या तशाच आम्ही कचऱ्यात टाकू शकू."

सॅनिटरी नॅपकिन्स आणि डायपर्सच्या उत्पादकांना गाठून त्यांच्या या उत्पादनांची योग्य विल्हेवाट लावण्याचा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी 'स्वच्छ'चे गेली दोन वर्षे सतत प्रयत्न चालू आहेत. ४ फेब्रुवरी २०११ रोजी पर्यावरण आणि वनविभाग खात्याने सूचीत केलेल्या ***प्लास्टिक कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियमांमधे समाविष्ट असलेल्या उत्पादकांची विस्तारीत जबाबदारी (इपीआरः एक्स्टेंडेड प्रोड्युर्सस रिस्पॉन्सिबिलिटी)*** मधील तरतूदींनुसार, आपल्या उत्पादनांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची, विशेषतः अजैविक कचऱ्याची, पर्यावरणीयदृष्ट्या योग्य विल्हेवाट लावण्यासाठी, स्वतःच्या खर्चाने योग्य यंत्रणा उभारुन त्या कचऱ्याचा ऱ्हास निर्धोकपणे होईल याची अंतीम जबाबदारीदेखील उत्पादकाचीच आहे. सॅनिटरी पॅड्सची ना पुनर्निर्मिती होऊ शकते ना त्याचा पुर्नवापर. तसेच त्यांचे जैविक विघटन शक्य नाही. कोणत्याही वस्तुच्या उत्पादनापासून ते त्याच्या अंतापर्यंतची संपूर्ण जबाबदारी ही त्या उत्पादकाची असते यात त्या वस्तुची हाताळणी व त्याच्या कायमस्वरुपी विघटनासंबंधीच्या मुद्यांचाही समावेश आहे.

उत्पादक या प्रश्नाचा गांभिर्याने विचार करत नसल्यामुळे त्याचे आरोग्यावर होणारे दुष्पपरिणाम मात्र कचरावेचकांना भोगावे लागत आहेत. कचरावेचकांचे आरोग्य तशीच त्यांच्या कामाची प्रतिष्ठा अबाधित रहावी यासाठी 'स्वच्छ' ने वेळोवेळी पाऊले उचलली आहेत व काही साधनेही तयार केली आहेत. डायपर्सच्या पिशव्यांवर लावायची ही लेबल्स हे या उपाययोजनांतीलच एक पाऊल आहे.

आपली मागणी नागरीक 'स्वच्छ'च्या या दूरध्वनी क्रमांकावर ९७६५९९९५०० अथवा swachcoop@gmail.com.
या संकेतस्थळावर नोंदवू शकतात.

ही लेबल्स वापरण्याचे महत्व नागरीकांनी ओळखावे अशी कचरावेचकांची मनापसूनची अपेक्षा आहे. कोणाही एका माणसाची शारीरिक विष्ठा दुसऱ्या माणसाने का हाताळावी?

***अधिक माहितीसाठी मनीषा देसाई यांच्याशी ९७६५४०५४५५ या क्रमांकावर संपर्क साधा***